All laparoscopic procedures like URS and PCNL for urinary stones, LAO CHOL for Gall stones, Laproscopic hernia repair, Laprascopic appendixectomy, Holmium Laser treatment for enlarged prostate have overcome almost all the disadvantages of open surgery like hospital stay, severe blood loss needing blood transfusion, long ugly operative scar, prolonged recovery period or risk of hernia at scar site.

**Conclusion :**

Open surgery has no role left in the management of all the above mentioned diseases.

Following is a comparative Table of HOLEP & TURO.

| | HOLEP | TURP |
|---|---|---|
| Hospital stay | 24-36 hrs | 4-7 days |
| Blood Transfusion | < 0.1 % | 5-15 % |
| Catheter time | 24-36 hrs | 3-5 days |
| Erectile dysfunction | 10 % | 30 % |
| Post operative stricture | 1 % | 5-10 % |
| Gland size | upto 300 gms | < 70 gms |
| Bleeding tendency patients | Safe | Cannot treat |

## Free Medical Check up for SBI Pensioners

M/s R.G.Stone Urology and Laparoscopy Hospital, Khar, Mumbai have organized a medical camp for the staff and pensioners of the State Bank of India **free of cost** from 1st November 2008 at the undernoted address. The hospital will take Blood Tests, Urine Test, Full Abdomen Ultra Sonography, Pap Smear, Prostate Specific Antigen, Uroflowmetry and specialist consultation, all free of cost. (Total cost of tests, if charged, would have been about Rs.4,000/-) The camp is mainly for our members in and around Mumbai but outside members also would be entertained.

Those members who are interested should avail of the facility by fixing proir appointment with Ms.Sunita on Phone Nos.(022)26041395; 26043260; 26057805-06. The members who are approved for the tests should carry their identity card with them on the day of the test to facilitate matters. **The period of the Camp has been extended upto 31st January 2009.**

Camp Venue :
M/s R.G.Stone Urology & Laparoscopy Hospital
21-A, 14-A Road, Ahinsa Marg, Khar (W), Mumbai - 400052

- Secretary

# Wishing
# a Happy Christmas
# &
# Prosperous New Year
# 2009

## j अजातशत्रू श्रेष्ठी

१४ ऑगस्ट २००८. आमच्या मित्रपरिवाराच्या दृष्टीने तसा काळा दिवसच. याच दिवशी आमचे परममित्र, कुटुंबातील जणू एक सदस्य श्री.सुरेश पतकी (कोल्हापूर) यांच्या निर्वाणाची अविश्वसनीय वाटणारी वार्ता कळली आणि धक्काच बसला. बातमी खोटी असावी असे वाटले. पण नियतीपुढे सर्वांनीच माघार घेतली. गेल्या ३०-३५ वर्षांच्या निकट सहवासाने आमच्या आठवणी जाग्या झाल्या.

त्यांच्या रूपाने एक चांगला माणूस, जणू आमचा आदर्शच आम्हाला सोडून गेला होता. अनेक दुर्मिळ स्वभाव विशेष श्री. पतकींच्या ठायी होते. थोडाफार भिडस्त, मितभाषी, सुस्वभावी, प्रेमळ सर्वांना हवाहवासा वाटणारा, आप्त स्वकीयांना आधार वाटणारा, कोणाशीही वैरभाव नसलेला असा हा आमचा मित्रश्रेष्ठ आम्हाला अनपेक्षितरीत्या सोडून गेला. सोलापूरच्या आमच्या मित्रपरिवारात श्री. पतकी हे थोडेफार वयाने ज्येष्ठ होते. अनुभवाने समृद्ध, नि:पक्षपाती, निगर्वी व नि:स्वार्थी. श्री. तम्मा पाटील त्यांना आदराने 'श्रेष्ठी' म्हणत. कोणाशीही बोलताना त्यांच्या विचारांची शब्दफेकीची एक मर्यादा होती. एक दर्जा होता. संताप अनावर झालेला अशा त्यांना मी कधीच पाहिले नाही. एखाद्या व्यक्तीविषयी राग, अनादर व्यक्त करण्यासाठी फक्त वेडा, मूर्ख या विशेषणांपेक्षा खालच्या दर्जाचे अपशब्द त्यांच्या जिव्हेवर कधीही आले नाहीत. तसे बार्शी हे त्यांचे मूळ गाव. सर्व पतकी कुटुंबीय उच्चशिक्षित व सुसंस्कृत, सर्व भावा-बहिणीत इतरत्र दुर्मिळ असणारी एकी, सामंजस्य व आपुलकीची आंतरिक प्रेमभावना आई-वडिलांच्या मृत्यूनंतर कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती म्हणून सर्वांनाच त्यांनी मानसिक आधार दिला. 'दादा' म्हणून सर्वांनीही त्यांचा यथोचित मान ठेवला.

शाखा व्यवस्थापक असताना सर्वच ठिकाणी सर्वांच्या मदतीसाठी त्यांचे पाऊल सदैव पुढे असे. कर्मचाऱ्यांच्या अडचणींची वैयक्तिक-आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांना माणुसकीच्या भावनेतून योग्य ती मदत करण्यासाठी सदैव त्यांची धडपड असे. बँकेतील संपूर्ण नोकरी त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे व जीव ओतून केली. त्यांचे कोणत्याही कामाचा पाठपुरावा करण्याचे कसब व सातत्य वाखाणण्याजोगे होते. बँकेतील काम असो, सरकारी किंवा निमसरकारी सहकारी, खाजगी संस्था असो, फोनवर बोलून प्रत्यक्ष भेटून ते कामाचा पाठपुरावा करीत. ज्या ज्या ठिकाणी त्यांचे पोस्टिंग झाले तेथे तेथे त्यांनी आपल्या स्वच्छ व निर्मळ स्वभावाने खूप लोकसंग्रह जमविला.

श्री. पतकी जात्याच तसे बुद्धिमान. CAIIB चुटकीसारखी पार केली. इंग्रजीवर तर त्यांचे जबरदस्त प्रभुत्व. या संबंधाने एक किस्सा आठवतो. स्टेशन रोड सोलापूर येथे क्लार्क म्हणून काम करताना स्टाफ युनियन व शाखाधिकारी यांच्यात तसा नेहमीच नैमित्तिक लेखी पत्रव्यवहार होई. युनियनचे पदाधिकारी श्री. पतकी यांच्याकडून तत्संबंधीचे पत्र बँकेचे नावे इंग्रजीत ड्राफ्ट करून घेत. ते पत्र वाचताना त्यावेळच्या शाखाधिकाऱ्यांना जवळ डिक्शनरी घेऊन बसताना आम्ही पाहिले आहे.

श्री. पतकींच्या बँकेतील नोकरीचा बराच काळ मराठवाड्यात गेला. उस्मानाबाद, लातूर, बीड, उदगीर इ. अनेक ठिकाणी त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली होती. त्याचबरोबर सोलापूर, पुणे झोनल ऑफिस, पुणे ट्रेनिंग सेंटर येथेही अतिशय प्रामाणिकपणे व मार्गदर्शनपर काम केले. एक Thorrow Gentleman म्हणून सर्वांनाच परिचित असलेला आमचा परममित्र, बँकेतील वरिष्ठ मार्गदर्शक सहकारी, सर्वांना हवाहवासा वाटणारा शेजारी व एक संघटनप्रिय कार्यकर्ता याहीपेक्षा आमचा एक कुटुंब सदस्य म्हणून श्री. पतकींच्या जाण्याने आमच्या छोट्याशा विश्वात एक खोलवर पोकळी निर्माण झाली. माझ्या माता-पित्यांच्या निर्वाणानंतर मला-आम्हाला बसलेला हा धक्का शेवटपर्यंत आम्हाला हादरे देत राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो.

**- दत्तात्रय रामचंद्र बेंद्रे,** सोलापूर

भ्रमणध्वनी : ९०११६८७६०१. दूरध्वनी : ०२१७-२३७३६०७



## j घरचा वैद्य

अजून पेन्शन वाढ झाली नाही म्हणून लगेच आमरण उपोषणाला सुरूवात करू नका - चांगले शंभर वर्षे जगलात तर दुप्पट पेन्शन मिळेल - सकाळ-संध्याकाळ हा सरकारी चमचाभर काढा घ्या.

**- मधुकर पालकर,** पुणे

## j पोस्टाची (ही) शोध पत्रकारिता !

मथळा वाचून दचकलात ?

आजचे जागतिकीकरणाचे युग तसा जीवघेण्या स्पर्धेचा काळ! मिडियाही त्याला अपवाद नाही. 'स्टोरी' साठी शोध पत्रकारिता अवलंबावी लागते. वेळप्रसंगी 'स्ट्रींग' ऑपरेशनही करावी लागतात; कधी खरी, कधी खोटी !

सांगायचे इतकेच की, ई-मेल, एस्.एम्. एस्., कुरीयर सेवा इ. च्या महास्फोटात पोस्ट खात्याचे धाबे दणाणले आहे ! काही पाश्चिमात्य देश तर चक्क त्याला मोडीत काढायला सरसावले आहेत.

परंतु आपले भारतीय पोस्ट खाते तसे चिवटही ! प्रतिकूल परिस्थितीतही ते अस्तित्वाची लढाई प्राणपणाने लढत आहे.

झाले असे की, परवा मला एक पत्र आले (पोस्टकार्ड). त्यावर माझा पत्ताच नव्हता. तरीही ते माझ्यापर्यंत सुखरूप पोहोचले.

विचारशक्तीला खूप ताण देऊन मी पुढील तर्काप्रत पोहोचलो. त्या पत्राच्या जागेत प्रेषक म्हणून 'स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन'चा पुसटचा स्टँप मात्र होता. मला वाटते प्रेषकाच्या शोधासाठी पोस्टल कर्मचारी माझ्या असोसिएशनच्या कार्यालयात धडकले असावेत. मग त्यांनी त्यांचे आऊटवर्ड रजिस्टर चाळले असावे. प्रयत्नांती माझ्या नावापुढे डिस्पॅचरच्या 'डुलकी'ने पत्ता टाकायचा राहिला असावा. शेवटी एकदाचा मेंबर्स लिस्टमध्ये माझा पत्ता त्यांना गवसला असावा व ते पत्र मला पोहोचते केले गेले. (पटते का, पोस्टाचा लौकिक पहाता ?)

परिणामी माझ्या अंगावर मूठभर मांस चढले. क्षणभर मी स्वत:स celebrityसमजलो. ते काहीही असो. माझे पत्र तर मला मिळाले ! येत्या दिवाळीत भरपूर 'पोस्ट' देईन म्हणतो

अशी ही पोस्टाची शोध (पत्रावर नसलेल्या पत्त्याचा शोध) कारिता

**खुलासा -**

पोस्टाची क्षमा मागून अनवधानाने पोस्टाला दिलेली सगळी compliments मागे घेत आहे.

संबंधित पत्रावरील पत्त्याच्या ठिकाणी प्रेषकाने लावलेले माझ्या नावाचे स्टिकर पत्र deliver झाल्यावर निखळून पडले होते. त्यामुळेच माझा (गोड) गैरसमज झाला होता. शेवटी स्टीकरचा गम पोस्टाच्या खळीहून पातळ निघाला.

**- शरच्चंद्र चौधरी,**

A

३८ 'रेणुका' अयोध्यानगर, नाशिक - ४२२००६

दूरध्वनी : २४१४५९४१,

भ्रमणध्वनी : ९४२३९२५५१४

## j निवृत्ती

धुंद रंगीन आयुष्य त्या दिवसांसारखे
पुन्हा व्हावेसे वाटते तरुण त्या दिवसांसारखे ।
कसे भरकन दिवस सरते ते तारुण्याचे
आता आयुष्यात नाही काही उरले त्या दिवसांसारखे ।
खूप गूढ कुतूहल होते त्या दिवसाचे
कशा सिनेमात पाहिले रम्य चित्रण त्या दिवसाचे ।
म्हणता म्हणता आयुष्यात तो क्षण आला
अन् हळुवार हातांनी तारुण्य फुलले त्या रात्रीचे ।
एका कळीचे मग फुलांत रूपांतर झाले
आयुष्य अचानक प्रौढपण बनून गेले ।
प्रत्येक गोष्ट करताना विचार समोर यायचा
हळुहळु नव्या आयुष्याशी मी समरस होऊन गेले ।
संध्याकाळी आयुष्याच्या आता हिशेब समोर येतो
खूपशा बेरजा वजाबाक्या पण दाखवून जातो ।
अन् मन त्यात कसे हरवूनच जाते
गेलेल्या तारुण्याचे गणित मनाला हळूच सलून जाते ।

**- रमेश त्रिं. इंगोलीकर,** अमरावती

दूरध्वनी : ०९२५-२६७१८८७.

## जमलं बुवा एकदाचं !

कोणी एक वधुपिता । वरपित्याकडे आला ।
मुलगा तुमचा लग्नाचा का । चौकशी करता झाला ।।
जेव्हा पत्रिका छान जमली । तेव्हा स्वारी खूष झाली ।
मुलगी बघण्याचा कार्यक्रम ठरला । नवरा मुलगा दाखल झाला।।
मुलगी पाहिली, चहा झाला मुख्य मुद्दा पुढे आला ।
मुलगी आम्हांस पसंत आहे । वरपिता बोलून गेला ।।
मात्र एकच गोष्ट खुल्लम खुल्ला । सांगतो आहे तुम्हाला ।
मुलाला ऐकू येते फक्त एकाच कानाने ।
तरी पण मुलीला वागवेल मानाने ।।
वधुपिता म्हणाला,
फारच छान ! मोकळेपणाने सांगितले ।
आम्हालाही बरे वाटले ।।
मुलगा आम्हाला पसंत आहे ।
जोडा कसा छान शोभतो आहे ।।
फक्त एकच गोष्ट सांगतो तुम्हाला,
जरी दोन्ही कानांनी ऐकू येत नाही मुलीला ।
सांभाळून घेईल ती जरूर तुम्हाला ।।



**- प्रभाकर गुपचूप,** पुणे

# j आप आगे बढो-हम आपके साथ है ।

यंदाच्या वर्षी आमच्या सोसायटीच्या 'सार्वजनिक गणेश मंडळा'वर माझी अध्यक्ष म्हणून एक मताने निवड झाली आणि सर्वांकडून माझ्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे असा भास झाला. शेवटचे एक निर्णायक मत आमच्या सौभाग्यवतींचे होते कारण आजपर्यंत सोसायटी -युनियन-असोसिएशन-फेडरेशन उपोषण, संप, सत्याग्रह, लढा, रेटा, घोषणा असले शब्द जरी कानावर पडले तरी त्यांना त्रास होत असे. माणसाने कसे तांबड्या भोपळ्यातील बियांप्रमाणे पोटातले पोटात मस्त गारव्यात जीवन जगावे. लढणारे लढतील, मिरवणारे मिरवतील, मरणारे मरतील, आपण याचे सोयरसुतक पाळू नये आणि मागण्या मान्य झाल्यावर सर्वांबरोबर आपल्याला पण फायदे मिळतीलच; मग त्यासाठी जीवाचा एवढा आटापिटा कशाला ? या थोर विचारसरणीच्या त्या होत्या. आता मात्र माझ्या वयाला पंचाहत्तर व आमच्या शुभमंगल विवाहाला पन्नास वर्षे झाली. यामुळे या वर्षीपासून आमच्या मंडळींना काहीतरी निराळे नावीन्यपूर्ण समाजकार्य करावेसे वाटत आहे. यालाच ग्राम्य भाषेत 'अंगात येणे' असे म्हणतात. तसे त्यांना वरचेवर होत होते; पण मीच नमते घेत असल्यामुळे कधी जमाव बंदी करावी लागली नाही. आमची सोसायटी म्हणजे एक म्युनिसिपाल्टी आहे. नाव 'एकता सहकारी गृह रचना मर्यादित' पण प्रत्यक्षात 'असहकारी गृह विवंचना अमर्यादित' हवे होते. कुणाचा कुणाला मेळ नाही. कोणालाही एक मिनिटभर वेळ नाही. सर्वांची अळीमिळी गुपचिळी, क्राँक्रीटच्या छपराखाली चार भिंतीत नि:स्वार्थीपणाचे पांघरूण पांघरून निर्जीव सांगाडे मतलबी हालचाल करीत होते. सोसायटी बाहेर एकमेकांस भेटल्यावर थोडेसे हसल्यासारखे करतात. काय कसे काय ? आज बरेच दिवसांनी दिसतोय अशी कोरडी चौकशी आणि सोसायटीचे आवारातच जर समोरासमोर दिसला तर या पाप्याची सावली अंगावर पडावयाला नको इतक्या लांब अंतरावरून दृष्टीआड. याउलट महिला मंडळाचे कार्य व त्यापुढे सोसायटीतील पोरटी काँग्रेस गवतात उगवलेल्या रानफुलांच्या रोपट्यासारखी सदा टवटवीत. सगळ्यांना सगळ्यांच्या घरातील घडामोडी, जोडाजोडी, भानगडी, बाराखडी प्रमाणे तोंडपाठ; प्रत्येकाच्या स्वयंपाकघरातील खिडक्या दूरचित्रवाणीप्रमाणे अखंड चालू असतात. तर दारोदारी काम करणाऱ्या मोलकरणी-मालकीणींना भ्रमणध्वनीप्रमाणे अखंड बातम्या देत असतात. वयात आलेल्या मुलामुलींच्या रहस्यकथा तुमच्या माझ्यात आडपडदा न ठेवता पडद्यावर दाखविल्या तर सगळी रेकॉर्डस् मोडली जातील. याउलट पुरुष वर्ग आयाळ नसलेला, दंतपंक्ती उठलेला, बोथट नखांचा, कुटुंब प्रमुखाचा शिक्का मारलेला, कशी काढली मी पंचवीस वर्षे या सोसायटीत आणि पन्नास वर्षे वैवाहिक बंधनात. परमेश्वरा स्वर्गात बसल्या बसल्या तू या गाठी मारल्या असतील तर सुरुवातीस त्या सजल्या व उमलल्या. तरुणपणी फुलल्या आणि वयोपरत्वे कोमेजल्या इतकेच. पण गळून पडल्या किंवा सुकल्या नाहीत ही तुझीच कृपा.

माझ्या मंडळींना मी पण काहीतरी भव्य दिव्य करून दाखवावे असे मनात होते. यामुळे त्यांच्या एका मतावर मी अध्यक्ष झाल्यामुळे त्या आपोआप अध्यक्षीणबाई होणार. सत्कार समारंभ होणार. बरोबरीने हिंडणार आणि समाजाला सहकाराचे डोस पाजणार याची मला खात्री होती.

अध्यक्ष झाल्याबरोबर एक चुणचुणीत छोकरा माझ्याकडे आला आणि 'काका-काका या वर्षी गणेशोउत्सव आपण दणक्यात साजरा करू या' म्हणून सांगू लागला- पहिल्यांदा आम्ही दहा दिवस गणपती बसवत होतो. सकाळ संध्याकाळ आरती, विविध कार्यक्रम, प्रसादाची रेलचेल व शेवटी विसर्जन. पण पुढे कळत नकळत काढता पाय टाकणारे सभासद जास्त झाले व शेवटी गणपती व मीच विसर्जनास जात होतो. दहा दहा हेलपाटे मारून एकजण एक रूपया सुद्धा वर्गणी देत नव्हता. एखादा चांगला सांस्कृतिक कार्यक्रम ठेवला तर सोसायटीचे अंगणात टाकलेल्या मंडपात न येता बेडरूममधील खिडकीतून ते आस्वाद घेणार. यामुळे सध्या मी मुख्य प्रवेश द्वाराजवळील 'ईन' या पाटीखालून सकाळी गणरायास आणतो आणि सायंकाळी 'आऊट' पाटीखालून विसर्जनाला घेऊन जातो. गणपती बाप्पा हे सगळं भरल्या पोटी उघड्या डोळ्याने बघतो आणि उंदराच्या पाठीवर बसून पृथ्वी प्रदक्षिणा घालण्यासाठी निघून जातो. देवबाप्पा म्हणतात सगळ्या जगात असे आहे. कामापुरते नाते आणि पुढारीपणासाठी मते. कोणी कोणाचे नाही. देशील ते माझे आणि उरेल ते पण माझेच. कार्य-कार्यकर्ता-कर्तव्य-क्रांतिकारक-कुलीन-कुलाचार-कुलप्रमुख हे सर्व शब्द त्यांचे शब्दप्रयोग आता शब्द कोशात टाका. निदान सहकार्यात सहभागी झालात तरी चालेल. तुमची नुसती उपस्थिती पण अगत्याची आहे. संवाद साधा - 'संवाद' वाचा - दिलेल्या सादास प्रतिसाद तरी द्या. पुष्कळ झाले. बालकाचे कीर्तन चालू होते. माझ्या गाढ निद्रेत विचारांचे नर्तन चालू होते. इतक्यात दारावरची बेल वाजली आणि अध्यक्षीणबाईंनी दार उघडले, ''अहो झोपलात काय ? ऑफिसच्या मुख्य कार्यालयासमोर आपल्या असंख्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी आज निदर्शनाचा कार्यक्रम आहे. त्याला तुम्ही येणार नाही ?'' काही कार्यकर्ते विचारीत होते.

''हे आले असते, पण काल किनई ह्यांना एक-दोन वेळेस शिंक आली आणि घसा जरा खवखवतो असे म्हणाले. अहो मुंबईची पावसाळी हवा - लोकलमधील गर्दी व यांची सर्दी. उद्या अंथरूण

धरले तर ? मेडिकल कोटा पण संपलेला. तुम्हीच मुंबईहून परत आल्यावर काय काय झाले – कोण कोण भेटले – या महिन्यात ॲरिअर्स मिळतील का हे सांगा'!

माझ्या वतीने अध्यक्षीणबाईंनी समारोपाचे भाषण केले. मी परत तोंडावरून पांघरूण घेतले. गेल्या पन्नास वर्षात तिने माझी काळजी अशीच घेतली आणि पुढील पन्नास वर्षे अशीच घेणार याची खात्री. मग – सेवानिवृत्तांचा संघ, सभासदत्व, सभासदांच्या मागण्या, निवेदने, निदर्शने, भाषणे, उपोषणे कशाला ? मी अर्धवट झोपेत, तारे तोडीत होतो. मुलगा मात्र 'घालीन लोटांगण वंदीन चरण' म्हणत होता. तर मंडळी 'डोळ्यांनी पाहीन रूप तुझे' गुणगुणत दाराला परत कडी घालत होत्या, 'आप आगे बढो हम पीछे है ना ? फिकीर मत करो आगे बढो'– कुठून तरी आवाज आला.

**– मधुकर पालकर,** पुणे
१०२१/२२ सदाशिव पेठ, पालकर चेंबर्स,
नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०.

## j किमयागार

देवा, तू अजब जादूगार ।
आम्हा दाविसी अद्‌भुत किमया
जगी या अपरंपार ।।धृ।।
रोज सकाळी प्राचीवरती सूर्यबिंब हे फुले
दिवस जागवून सायंकाळी क्षितिजाखाली झुले ।।
अधांतरी हा प्रवास सगळा
नाही कुठे आधार ! ।।१।।
इवले इवले बीज कसे हे, मातीखाली रूजे
चटके खाई ग्रीष्माचे अन् शिशिरामध्ये थिजे ।।
परि कोंभ कोवळा अमृत प्राशुनि
होई गगनाकार ! ।।२।।
कित्येक आले, कित्येक गेले, जग हे अखंड चाले
पक्षी उडती, जलचर बुडती, कधी न उलटे झाले ।।
वाढे गर्दी लाखपटीने
परि नाही भूमिला भार ! ।।३।।
चैतन्याचे मळे फुलविते, हळुवार तुझी फुंकर
क्षणात त्याचे स्मशान होते, तू पाठ फिरवल्यावर ।।
पदोपदी जग रूप पालटे
जरि तूं निराकार ! ।।४।।

**– गोविंद करमरकर,** सांगली
दूरध्वनी : ०२३३-२३२०९११

टूरवेज
ॲड.

## j नेत्रदान-दृष्टिदान-डोळे हवेत डोळे

२५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर हा पंधरवडा नेत्रदान पंधरवडा म्हणून साजरा केला जातो.

भारतात सुमारे २० लाख तर महाराष्ट्रात सुमारे तीन लाख नागरिक दृष्टिदाता मिळत नाहीत म्हणून अंधार भोगत आहेत. अजूनही आपल्याकडे नेत्रदात्यांचे प्रमाण कमी आहे. नेत्रदानाचा आकडा महाराष्ट्रात दरवर्षी ३५००० एवढा आहे. काही गैरसमजुती आणि नेत्रदानाविषयी अनास्था यामुळे आपलेच लाखो बांधव अंध:कारात आयुष्य कंठत आहेत. आपण त्यांच्या आयुष्यात प्रकाशाचा किरण देऊ शकतो.

महाराष्ट्रात नेत्रदानाबाबत जनजागृती मोहीम सुरू असली तरीही मागणीच्या प्रमाणात उपलब्धता अत्यल्प असल्याने डोळ्यांची तीव्र टंचाई भासत आहे. त्यातूनच अपघातामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांचे डोळे सक्तीने काढून घेण्याचा कायदा करण्याची गरज पुढे येत आहे. श्रीलंकेमध्ये डोळे ही राष्ट्रीय संपत्ती मानून मृत्यूनंतर काढून घेतले जात असल्याने देशांतर्गत गरज भागवून ते डोळे निर्यात करू शकतात.

मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केलेला असूनही नातेवाईकांकडून त्याचे पालन केले जात नाही. नेत्रदानाविषयी वस्तुस्थिती समजून घेतली तर असे गैरसमज दूर होऊ शकतील.

या जन्मी नेत्रदान केले तर पुढच्या जन्मी आंधळेपणा येतो असाही एक गैरसमज काही अंशी आहे. या जन्मी केलेले पुण्य पुढच्या जन्मी उपयोगी पडत असेल तर नेत्रदानासारखे श्रेष्ठदानाचे पुण्य वाया कसे जाईल ?

नेत्रदान हे सर्व जाती धर्म विचार पद्धतीमध्ये श्रेष्ठ समजले जाते मग असे श्रेष्ठ दान केवळ गैरसमजुतीमुळे टाळणे योग्य होईल काय ?

नेत्रदानाबाबत सरकारी स्तरावर जनजागृती मोहीम राबविण्यास सुरवात झाल्याने त्याचा चांगला परिणाम झाला आहे. महाराष्ट्रात २००२ मध्ये पाच हजार डोळे मिळायचे. सध्या आकडा ३५ हजारावर गेला आहे. कुठलीही चळवळ रुजायला वेळ लागतो. विविध सामाजिक घटकांमध्ये रक्तदानाबाबतही अशीच नैराश्याची भावना होती. रक्तदानाची चळवळ रुजायला किमान पन्नास वर्षाचा कालावधी जावा लागला. समाज धुरीणांनी केलेल्या मशागतीमुळे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात समाजोपयोगी गोष्टी खूपच लवकर रुजतात. फक्त कुणीतरी सुरवात करण्याची गरज असते.

कायदा करण्याच्या दृष्टीने होत असलेले विचारमंथन हा नेत्रदान चळवळीचा शुभारंभ ठरेल असा विश्वास वाटतो.

**नेत्रदान-दृष्टिदान :-**

जगातील एकूण १० कोटी अंध व्यक्तींपैकी २० टक्के अंध भारतात आहेत. कुपोषण, 'अ' जीवनसत्त्वाचा अभाव, डोळ्याला मार लागल्यामुळे, कचरा गेल्यामुळे, रसायन उडाल्यामुळे तसेच गोवर, कांजण्यांमुळे डोळ्यात टीक पडल्यामुळे दृष्टी गमावल्यांची संख्या २० लाखांपर्यंत आहे. अशा व्यक्तींना नेत्ररोपणाने दृष्टिलाभ होऊ शकतो. आज आपल्या सुजलाम् सुफलाम् देशात नेत्र रोपणाचे प्रमाण फक्त दोन हजार (दोन टक्के) आहे. या आकडेवारीवरून आपल्या लक्षात येईल की नेत्रदानाची किती गरज आहे. पण हे नेत्र येणार कुठून ? ते आपणच दिले पाहिजेत. मृत्यु हा प्रत्येकाला आज ना उद्या येणारच आहे. ज्या नेत्राने आपण जन्मापासून मृत्यूपर्यत हे सुंदर जग पाहिले ते आपले नेत्र मृत्यूनंतर मातीमोल होऊ देऊ नका. त्याच आपल्या दोन डोळ्यांनी मृत्यूनंतर दोन अंधांना जग पाहण्याची संधी द्या. डोळे मिटून थोडा वेळ असं समजा की आपण नेत्रहीन आहोत. काय अवस्था होईल आपली ? पण ज्यांचे जीवनच अंध:कारमय आहे त्यांचे काय याचा विचार करा.

**नेत्रदान म्हणजे काय ?**

मृत्यूनंतर ताबडतोब आपले डोळे नेत्रपेढीस दान करणे म्हणजे नेत्रदान. नेत्रदान मृत्युपूर्व करता येत नाही. मृत्यूनंतर ताबडतोब नेत्रपेढीस कळविल्यास चार तासांच्या आत डोळे काढून घेतले जातात. नेत्रपेढीचे कर्मचारी घरी येऊन डोळे काढून नेतात.

**नेत्रदानाची इच्छा असल्यास काय करावे ?**

नेत्रदानाची इच्छा असल्यास तसे इच्छापत्र मृत्यूपूर्वी नेत्रपेढीत भरून देता येते. जवळचा नातेवाईक आणि फॅमिली डॉक्टरांच्या सह्या घ्याव्या लागतात. जवळचा नातेवाईक शक्यतो मुलगा किंवा मुलगी असावेत. कारण मृत्युसमयी मुलगा व डॉक्टर हे उपस्थित असतात. ते नेत्रपेढीस कळवू शकतात. परंतु नेत्रदान इच्छापत्र भरले नाही तरी मृत्यूनंतर नातेवाईकांनी तशी इच्छा प्रदर्शित केल्यास डोळे काढून घेतले जाऊ शकतात. नेत्रदान मृत्यूनंतर चार तासांचे आत करावे लागते.

**डोळे काढल्यावर मृत शरीरास विद्रुपता येते का ?**

डोळे काढल्यावर पापण्या अशा रीतीने शिवल्या जातात की मृत व्यक्तीच्या चेहऱ्यास विद्रुपता येत नाही.

**नेत्रदान सुलभ व्हावे या दृष्टीने नेत्रदात्याच्या नातेवाईकांनी काय काळजी घ्यावी ?**

१) ताबडतोब नेत्रपेढीस कळवावे. फोनवरून कळविताना घरचा पूर्ण पत्ता, जवळची खूण, फोन असल्यास फोन नंबर द्यावा. मृत्यूचे कारण व केव्हा मृत्यू झाला ते कळवावे.

२) डॉक्टरांकडून मृत्यूचे प्रमाणपत्र घ्यावे कारण मृत्यूचे प्रमाणपत्र असल्याशिवाय डोळे काढून घेतले जाऊ शकत नाहीत.

३) मृत शरीराचे डोळे बंद करून त्यावर बर्फ किंवा थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. अँटीबायोटिक थेंब घालणे असल्यास डोळ्यात घालावेत.

४) खोलीतील पंखा किंवा एअरकंडिशनर बंद करावा.

५) डोक्याखाली उशी ठेवावी.

**कोणाचे डोळे काढून घेतले जात नाहीत ?**

मृत व्यक्तीस काही ठराविक विकार असल्यास डोळे काढून घेतले जात नाहीत. ते विकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) रेबीज २) एड्स ३) व्हायरस ४) एन्केफेलायटीस् ५) धनुर्वात ६) पसरलेला कर्करोग ७) सिफिलीस ८) गॅस गॅंग्रिन ९) रक्तात पू येणे १०) कुष्ठरोग ११) विषबाधेमुळे किंवा पाण्यात बुडून आलेला मृत्यु १२) काचबिंदू १३) डोळ्याचे पारदर्शक पटल खराब असणे.

**डोळ्याला चष्मा/मोतीबिंदू असल्यास नेत्रदान करता येते का?**

चष्मा किंवा मोतीबिंदू असलेल्या व्यक्तींना नेत्रदान करता येते. नेत्रदानास वयाचे बंधन नाही. कोणीही नेत्रदान करू शकतो.

**काढलेल्या डोळ्याचा विनियोग कसा केला जातो ?**

डोळे काढून आणल्यावर नेत्रपेढीत या डोळ्यांची तपासणी केली जाते. डोळ्यातील पारदर्शक पटल चांगले असल्यास ते नेत्ररोपणासाठी वापरले जाते. डोळे नेत्ररोपणास योग्य नसल्यास त्यांचा नेत्रसंशोधनासाठी उपयोग केला जातो.

**नेत्ररोपण म्हणजे काय ?**

डोळ्यातील पारदर्शक पटल अपारदर्शक झाल्यामुळे अंधत्व आले असल्यास हे अपारदर्शक पटल काढून नेत्रदानातून मिळालेले पारदर्शक पटल त्या जागी बसविणे म्हणजे नेत्ररोपण. संपूर्ण डोळा रोपण करीत नाहीत.

**नेत्ररोपण केलेल्या डोळ्याने मृत व्यक्तीने पाहिलेल्या वस्तु दिसतात का ?**

डोळ्याची रचना पाहिली असता ती कॅमेऱ्याप्रमाणे असते. कॅमेऱ्याचे भिंग बदलले तरी समोर असेल तसाच फोटो येतो. त्याप्रमाणे नेत्ररोपणानंतर जे समोर असते तेच दिसते. नेत्रदात्याने पाहिलेल्या वस्तूंचा त्यात काही संबंध येत नाही.

**नेत्रदानास कायद्याने बंधने आहेत का ?**

कायद्याने नेत्रदानास पुढील बंधने घातली आहेत.

१) नेत्रदान ऐच्छिक असावे.

२) मृत्युपूर्व नेत्रदान करता येत नाही.

३) मृत्यूचे प्रमाणपत्र असल्याशिवाय डोळे काढू नयेत.

४) कोणाचे डोळे कोणास बसविले यासंबंधी गुप्तता राखावी.

**- अनिल खाडिलकर**

## मरावे परि नेत्ररूपी उरावे

**पुण्यातील नेत्रपेढ्यांचे दूरध्वनी :**

| | | |
|---|---|---|
| भारती हॉस्पिटल नेत्रपेढी (विस्तारित क्रमांक - ११४) | : | २४३७२७८९ |
| दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल नेत्रपेढी | : | ६६०२३००० |
| ----- '' ------ | : | ४०१५१००० |
| ----- '' ------ | : | ४०१५१०७८ |
| जनकल्याण नेत्रपेढी | : | २४४४९५२७ |

ह्याविषयी अधिक माहितीसाठी किंवा काही मदत लागल्यास कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा.

अनिल खाडिलकर
'धनश्री' २४, स्टेट बँक कलारंग सोसायटी,
पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे - ४११ ००४
दूरध्वनी : २५४४०८५१. भ्रमणध्वनी : ९८५०९८४०४५

## विनोद सम्राट आचार्य - प्र.के.अत्रे

शुभ-अशुभ वैचारिक खेळात (तेरा) आकडा 'अशुभ' मानला जातो. आ.अत्रे यांच्या जीवनात १३ ता. महत्त्वाची ठरते. ते १३ जूनला वारले व १३ ऑगस्ट त्यांचा जन्मदिन. गंमतीने असं म्हणता येईल की ते आधी वारले मग जन्मले. यातील विनोद सोडला तर असे दिसते की आ.अत्रे विनोद घेऊनच जन्मले.

सर्वसामान्यांच्या, सर्व दर्जाच्या, सर्व वर्गाच्या समाजात ते वावरले. दारिद्र्यापासून श्रीमंतीपर्यंत सर्व सुखदु:खे, हालअपेष्टा, मान-अपमान त्यांनी पचविले. आपल्या जीवनानुभवातूनच त्यांनी विनोदी वाङ्‌मयनिर्मिती केली. समयसूचकता, हजरजबाबीपणा, स्पष्टवक्तेपणा, खेळकर खोडकर दिलदार वृत्ती, प्रांजलता हा त्यांच्या विनोदाचा पाया होता. त्यांच्या जिभेवर विनोद जणू नाचायचा. सामाजिक जाणीव, समाज सुधारण्याची जबरदस्त इच्छाशक्ती यासाठीच त्यांनी आपल्या वाणीने आणि लेखणीने साऱ्या महाराष्ट्राला सतत १०/१५ मि.नॉनस्टॉप पोटभर खळखळून हसायला शिकविले.

नीरस आयुष्याला जीवनाच्या सर्वच टप्प्यात संजीवनी देणारे आ.प्र.के.अत्रे यांचे विनोदी साहित्य आजच्या २१ व्या शतकात सुद्धा प्रेरणादायी ठरते.

**- अशोक शिवराम कुलकर्णी,**
नागाळा पार्क, कोल्हापूर
फोन :- २६६०४१८

## MEMORIES OF GOA LIBERATION DAY

I was 17 years old when Goa was liberated on 19th December 1961. After arrival at my school (Loyola H.S.) in Margao that morning by "carreira" (mini-bus) as usual, I was surprised to see a completely deserted look everywhere in Margao city. With no hope of transport of any kind, I walked from Margao to my village in Verna, nearly 15 kms. All along the road, I could hear occasional bursts of AKF guns at a distance, loud explosions of bomb blasts that were kept by the Portuguese at strategic bridges and culverts to slow down the advances of Indian army.

The Portuguese dictator Salazar had given standing orders to the last Governor of Goa "Goa ninguem conquistara, por si acabara" i.e. in case of defeat (Goa will not be conquered by anyone, will perish on her own). Fortunately for us, the last Governor was a good hearted and understanding man. He disobeyed the orders and surendered to Indian authorities on 18.12.1961. In the meanwhile, the anti-aircraft fire was from the only Portuguese warship "Afonso de Albuquerque" that was at anchor in Mormugoa Harbour. By their historical traditions, it refused to surrender inspite of ceasefire and white flags everywhere. The warship took shelter among other commercial ships lying in the Harbour. Its vigorous firing at the IAF aircrafts zooming overhead posed danger to the Indian Army about to enter and spread out at installations overland, besides endangering other commercial ships around it. The Indian Task Force at Delhi had given orders to capture it intact. But due to this nuisance value that it created to the Indian authorities, Indian frigates "Betwas", "Beas" and INS Cauvery engaged it giving final warning shots asking "Afonso de Albuquerque" to surender. The reply was only desperate gunfire after gunfire. Having been mauled and after some casualties on its board, it gave up the fight. The Indian Navy boarded the frigate on 21.12.1961. It was repaired and refloated on 10.03.1962, auctioned for scrap in June 1965 for Rs. 7.71 lacs only.

Only one Portuguese Bank was operating its branches in Goa i.e. Banco Nacional Ultramarino (B.N.U.) of which State Bank of India is the successor. Apprehending ground realities and under Orders, B.N.U. shifted entire pawned gold ornaments to Lisbon in time. However, the full stock of Portuguese currency notes from B.N.U. chests was ordered to be burned with kerosene. In the confusion, those of the staff who were assigned duties of burning the notes, whether they burned the entire lot, is a mystery. Such opportunities are rare.

**- Isac Hilario Dias**
Panji, Goa

********

## स्वागत : 'आपले सण आणि आयुर्वेद'

आपले सभासद श्री.मनोहर शंकर जोशी (नाशिक) यांचे चिरंजीव वैद्य मनीष जोशी यांनी लिहिलेले 'आपले सण आणि आयुर्वेद' हे पुस्तक वाचनात आले. पुस्तक फक्त ६४ पानांचे आहे. पण भरपूर माहिती आहे. आपण ज्या जगात पर्यावरणात वावरतो त्याचा आणि कालचक्राचा म्हणजे उन्हाळा, पावसाळा व हिवाळा याचा त्याचबरोबर उपलब्ध असणाऱ्या औषधींचा पूर्ण विचार करूनच आपले सण प्रचारात आले. दसरा, पाडवा साजरा करताना पक्वान्ने झोडली जातात. पण शरीरस्वास्थ्य सांभाळण्यासाठी पथ्ये पाळावी लागतातच, हे खरे आहे. तसा शारीरिक स्वास्थ्याबरोबर मानसिक स्वास्थ्याचा विचार आवश्यक असतो. आयुर्वेदात हे सारे कसे आले आहे याचा परिचय या पुस्तकात करून दिला आहे. साधे पाणी (वॉटर) पण त्याचे दिव्यजल व भौमजल, पुन: त्यांचे आठ उपप्रकार व गुणधर्म यांची माहिती मनोरंजक आहे.नित्य वापरातील चणे फुटाणे पण ते केव्हा कसे खावेत हे वाचणे आवश्यक. वर्षातील अकरा प्रमुख सण पर्वकालांची सांस्कृतिक माहितीही दिली आहे व त्या त्या ऋतूंमधील विधी निषेधांची माहिती आपणास व कुटुंबीयांना असणे आवश्यक म्हणून हे पुस्तक केवळ वाचनीय नव्हे तर संग्राह्यही आहे. वैद्य मनीष जोशींचे अभिनंदन.

– **श्रीधर वि.सहस्रबुद्धे**, पुणे

## औषध

रूग्ण : डॉक्टर मला सकाळी उठल्यावर लगेचच सर्दी पडसे खोकला याचा त्रास होतो.

डॉक्टर : तुम्ही उठल्याबरोबर सकाळी एक ग्लास कोमट पाणी पीत चला.

रूग्ण : ते मी रोजच घेतो. एवढेच की माझी पत्नी त्याला चहा म्हणते.

– **गोपाळ वि.मुळे,** फोन नं. २४२३०७१

# ✻ प्रतिक्रिया ✻

'संवाद' दिवाळी विशेषांक फार आवडला. 'बदली' ही प्रभाकर गुपचूप यांची विनोदी कथा फार आवडली. त्याचप्रमाणे श्री.पी.के.देवधर यांचे चौकटीतील विनोदही फार आवडले. जाने.२००६ पासून ते दिवाळी अंकांपर्यंत 'संवाद' मधील त्यांच्या आणि इतरांच्या विनोदाने एक प्रकारचे हेल्थ टॉनिक मिळाले. त्यांची किंमत होऊ शकत नाही.

**- सुरेश गोपाळ काटनेश्वरकर,** नांदेड

✻✻✻✻✻✻

मला 'संवाद' नेहमी वेळेवर मिळतो व तो मन:पूर्वक वाचून माझा आनंद द्विगुणित करतो. आपल्या पेन्शनर समाजात कोठे काय चालते, त्यांच्या मुला-मुलींचे प्रावीण्य ह्या सर्वांचा त्यात उल्लेख असतो. जोडीला श्री.प्रभाकर गुपचूप व श्री.पी.के.देवधरांचे हास्य फवारे व अनेक पेन्शनर बंधु भगीनींचे लेख, कविता असा सुंदर संगम असतो. आम्ही फक्त प्रेमाने वाचण्याचे काम करतो. आपण मात्र त्यामागे खूप कष्ट घेत आहात. धन्यवाद. आमचा 'संवाद' असाच चंद्र-सूर्य असेपर्यंत वाटचाल करो हीच देवाशी प्रार्थना.

**- अशोक द. बुटाला,** पवई, मुंबई

✻✻✻✻✻✻

'संवाद' मासिक दर महिन्याला अगदी वेळेवर मला मिळते. त्याबद्दल अत्यंत आभारी आहे. 'संवाद' कधी येतोय याची अगदी उत्सुकता लागलेली असते. त्यातील कविता, लेख, विनोद अप्रतिम असतात. प्रवास वर्णन तर अवर्णनीय असते, ते वाचताना अक्षरश: तो देश प्रांत साक्षात डोळ्यांसमोर येतो. घरबसल्या त्या देशाची सर्व माहिती मिळते. जे आपले असोसिएशनचे लोक जाऊन आले त्यांचे अभिनंदन. 'संवाद' मासिकाने प्रत्यक्ष संगळ्यांशी संवाद साधला असे वाटते.

- **श्रीमती शालिनी कानडे**, कल्याण

✻✻✻✻✻✻

आपला, आमचा व सर्वांचा 'संवाद' चा दिवाळी अंक एकदम उत्कृष्ट आहे व तो उच्च पातळीवरील वाङ्मयीन अलंकार आहे. त्याबद्दल सर्व लेखक, कवी, विनोदवीर सर्व संपादकीय मंडळाचे अभिनंदन. कोरेगावच्या सुहास बोकील यांनी आचार्य अत्र्यांच्या वाङ्मयाचा झेंडा अटकेवार फडकविला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. तसेच श्री.अरविंद नलवडे यांची लाखाची गोष्ट, श्री प्रभाकर कानिटकर यांची 'माझे जीवन गाणे ' ही कविता, श्री.पी.के.देवधर यांचे विनोद उल्लेखनीय आहेत. तसेच श्री.क्रांतिसेन आठवले यांचा -'तेजाचे पूजक आम्ही' हा दीपावलीवरील लेख म्हणजे वाङ्मयाचा उच्च पातळीवरील अविष्कार आहे.

- **सिताराम तेरवाडकर**, सांगली

'संवाद'चा नोव्हेंबर अंक वाचला. पृष्ठ क्रमांक २१ वर 'साखरेचे खाणार त्याला..' वाचले. विवेक ठाकुर, दादर(मुंबई) ह्यांच्या अभिरुचिहीनतेची खात्री पटली. असे साहित्य संपादकीय नजरेतून कसे सुटले ह्याचे आश्चर्य वाटले. असे यत्ता सोडून लिहिलेले साहित्य छापून 'संवाद' च्या प्रतिष्ठेला धोका संभवतो. कृपया नोंद घ्यावी.

**- अ.ल.देशपांडे,** अमरावती

✻✻✻✻

'संवाद-दिवाळी विशेषांक' भरमसाट किंमतीच्या दिवाळी मासिकांपेक्षा फारच दिमाखदार व छान वाटला.

✻ संपादकीयांतून सर्व समजले.

✻ बुटालांबरोबर बाकीच्यांच्या बायकाच बघत बसलोय.

✻ आरशाने आपले अंतरंग अचूक ओळखलेत.

✻ पावसाची प्रत्येक प्रसंगाची पडझड प्रत्यक्ष पाहिली.

✻ जीवनगाण्याने जीवनाची जान जागवली.

**- प्र.गो.काणेकर,** कोथरूड

✻✻✻✻✻✻

दरमहा उत्सुकतेने प्रतीक्षा असलेला 'संवाद' चा नोव्हेंबर २००८ चा अंक मिळाला. सेवानिवृत्तांच्या जिव्हाळ्याच्या सर्वच बाबींना योग्य तो न्याय देणारे सर्वस्पर्शी लिखाण, उत्कृष्ट संपादकीय इ. सर्वच दाद देण्यासारखे आहे. मुंबई झोनल सब-सेंटरच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त हे केवळ इतिवृत्तच नसून, संघटनेच्या शीर्षस्थ नेतृत्वाने सभेच्या माध्यमातून आपले प्रश्न बँक व्यवस्थापनासमोर मांडून त्याचा पाठपुरावा कसा योग्य दिशेने होत आहे याची जाणीव सर्वसामान्य सभासदांना करून दिली आहे. श्रीमती सरिता आवाड यांचे **Pure Banking & nothing else.....** मनाला चटका लावून गेले. पण हे प्रकटन सध्या जे **Pure Banking** च करताहेत त्यांचेपर्यंत कसे पोहोचणार ?

**- अविनाश निमदेव,** अमरावती

✻✻✻✻✻✻

'संवाद' चा नोव्हेंबरचा अंक मिळाला. श्री. आठवले यांचे संपादकीय मनापासून भावले व रूचलेही. 'संवाद' गृहपत्रिकेवरील चार ओळी मला खूप आवडतात. 'मना मनांचा मेळ जुळावा....' व पटकन ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील ओळ आठवते - 'भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे ।'

'संवाद'ची वाटचाल दिवसेंदिवस चढत्या क्रमाने होवो ही इच्छा !

**- सौ. वर्षा शरद जोशी,**

डोंबिवली पूर्व

# सांगलीचा 'व्ही.आर.एस. कट्टा'

सांगलीत स्टेट बँक परिवारातल्या प्रत्येकाची बित्तंबातमी देणारा व सर्वांना सहकार्याचा हात देणारा 'व्ही.आर.एस. कट्टा' म्हणजे सांगलीच्या विश्रामबाग परिसरातील 'विनायक बेकर्स' (प्रो.श्री.विठ्ठल कट्टी.) श्री.विठ्ठल कट्टी यांनी स्टेट बँकेतून निवृत्त होण्यापूर्वीच 'विनायक बेकर्स व जनरल स्टोअर्स' हे दुकान मुलांसाठी म्हणून सुरू केले. आता ते सेवानिवृत्त होऊन ६ वर्षे झाली आहेत. ते स्वत: व्ही. आर. स्कीममधून निवृत्त झाले आहेत. मुलगा व ते स्वत: दोघे मिळून व्यवसाय करतात.

कोण परदेशी गेले ? कुणाला नातू झाला ? कुणाची ७५ वर्षे पूर्ण झाली ? कुणाला पणतू झाला ? कोण आजारी आहे ? अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देणारे व सर्व तऱ्हेच्या बातम्यांचे चॅनेल म्हणजेच हा व्ही.आर.एस्. कट्टा.

इथे येण्याठी मुक्तद्वार आहे. कुणीही येऊ शकते. नाव नोंदणी करावी लागत नाही. स्टेट बँकेचे सांगली मिरज परिसरातील सर्व सेवानिवृत्त (व्ही.आर.एस.) कर्मचारी व इतर सरकारी कार्यालयातील सेवानिवृत्त यांची कायम इथे वर्दळ असते. सकाळी ७ पासून रात्री १० पर्यंत आपापल्या सवडीने लोक भेट देत असतात. त्यामुळे लग्नाच्या आमंत्रण पत्रिका देणे, इतर कार्यक्रमांच्या आमंत्रण पत्रिका व निरोप देणे ही कामे सुलभरित्या होतात.

स्टेट बँकेच्या पे इन स्लीप्स, पेन्शन सर्टिफिकेट फॉर्म्स, सर्व तऱ्हेची मोड इथे केव्हाही हजर असतात.

२४ तास टी.व्ही सुरू असल्यामुळे कायम क्रिकेट मॅचेस, ब्रेकींग न्यूज, राजकीय गप्पा अगर कोणत्याही विषयांवरील चर्चा इथे चालू असते. कायमस्वरूपी ५/६ खुर्च्या असतात.

श्री.विठ्ठल कट्टी या कट्ट्याचे आधारस्तंभ आहेत. तो सर्वांना नवस न करता पावणारा विठ्ठल आहे. आमचा सावळा विठ्ठल पंढरपुरात नाही तो तर सांगलीतच आहे.

६३ व्या वयातही चपळ, अतिउत्साही, लोकांना आपणहून बोलावणारा, ओळख करून घेणारा व त्यांचे प्रश्न सोडविणारा विठ्ठल केव्हाही हसतमुख चेहऱ्याने सर्वांचे स्वागत करतो. ज्याला जीवनाचा कंटाळा आला आहे अशा माणसाला इथे आणखी जगावेसे वाटेल.

सर्वश्री तेरवाडकर, सी.ए.कुलकर्णी, दिलीप वैद्य, गलगली, सूर्यकांत साठे इथे हमखास असतात. त्यांच्या खुर्च्या राखीव आहेत. स्टेट बँकेतील इतरही (व्ही.आय.पी) मंडळी वरचेवर येत असतात. सांगलीचे श्री.श्रीधर सहस्त्रबुद्धे सध्या पुण्यात असतात तेही सांगलीला आले की आवर्जून भेट देतात व सर्वांशी संवाद साधतात.

आपणा सर्वांनी एकदा अवश्य भेट द्या. आपले स्वागत होईल. आपला दिवस आनंदात जाईल. आपले प्रश्न सुटतील.

**– सिताराम तेरवाडकर,** सांगली

दूरध्रमण – ९४२२०४१५०४

# H ये ना चिमण्या...



ये ना चिमण्या, उभी मी तुजसाठी येथे ।
कातरवेळ झाली, झणी ये ना रे कुशीत ।
चल तुळशीस लावू मंद सांजवात ।
मम पदराशी खेळत ये रे दुडदुडत ।।१।।

ये ना एकदा, सांग वेड्या या मनाला ।
गेलास तू पुन: परतुनी येण्याला ।
चिमण्या ये ना वाट पाहे तुझी आई।
तुजवीण छकुल्या, माझे येथे कुणी नाही ।।२।।

का रे तुझ्या-माझ्यात हा भयाण काळोख ।
हात सुटोनी तू गेलास सोडून चिमुटराख ।
आता वाटे द्यावे फेकून हे जीवन ओझे ।
यावे तुझ्याकडे तेथे, जेथे चैतन्य विराजे ।।३।।

काळा ने मलाही माझा बाळ राही जेथे ।
मम प्राण नेलास ना, मग देह कां रे येथे ? ।
भेटवी रे लेकराला, विनवते तुला माय ।
माझ्या बाळावीण आता जगी माझे उरे काय ? ।।४।।

– **वसुधा ठाकुर**, दादर (मुंबई)

# खर्चिक

काशिनाथ आपल्या मित्राला सांगत होते.

'माझी बायको हल्ली सतत पैसे मागत असते. परवा तिने आठशे रूपये मागितले, काल चारशे तर आज दोनशे रूपये मागितले.

'अरे बापरे, वहिनी बऱ्याच खर्चिक आहेत वाटतं ? तुला त्यामुळे मोठी आर्थिक झळ सोसावी लागत असेल.' मित्र म्हणाला.

'छे छे ! तिने मागितले खरे. पण मी दिलेत कुठे ? काशिनाथ म्हणाला.

**– पी.के.देवधर,** पुणे

******

# बायको परत नको

कुणीतरी आपल्या गाडीचा पाठलाग करतो आहे असे वाटल्याने बाबूने आपल्या गाडीचा वेग वाढविला. पाठलाग करणाऱ्या गाडीचा वेगही वाढला. बाबूच्या ध्यानात आले की, पाठलाग करणारी गाडी पोलिसांची आहे. त्याने आणखी वेग वाढविला. पण अखेर पोलिसांनी त्याला गाठले आणि पो.इं. ने विचारले 'काय हो, कुठे पळून जात होता ?' बाबू माफी मागत म्हणाला, 'काल माझ्या बायकोला एका पोलिसाने पळविले. मला वाटले की तिला परत करण्यासाठी तो पोलिस येतोय म्हणून मी......'

**– पी.के.देवधर,** पुणे

Regd. under RNI No. MAHBIL05356/13/1/2008-TC & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

# अमेरिकन लोकशाही, बराक ओबामा आणि आम्ही

अमेरिकेच्या परिपक्व लोकशाहीचे
दर्शन सर्व जगाला घडले ।
कृष्णवर्णीय बराक ओबामा
बहुमताने राष्ट्राध्यक्ष निवडून आले ॥१॥
जॉन मॅक्केनने पराभव दिलदारपणे स्वीकारला
ओबामांचे अभिनंदन करून मोठेपणा दाखविला ।
कौतुक ओबामाच्या परिपक्व नेतृत्वाचे झाले
'परराष्ट्रमंत्री' पद त्यांनी, हिलरी क्लिंटनला दिले ॥२॥
प्रतिस्पर्ध्याला सन्मानाने 'परराष्ट्रमंत्री' करणारा
राष्ट्राध्यक्ष मोठ्या मनाचा असतो ।
म्हणून ओबामाच्या कुशल नेतृत्वात
अमेरिका अधिक सुरक्षित वाटतो ॥३॥
अब्राहम लिंकन आणि जॉन केनेडीचा वारस
मानवतावादी, राष्ट्रप्रेमी अपेक्षित असतो ।
म्हणून राष्ट्राध्यक्ष निवडताना
'कस' अमेरिकन जनतेच्या दूरदृष्टीचा लागतो ॥४॥
संयमी, मुत्सद्दी ओबामाची निवड
त्यांनी गुणवत्तेवर विवेक बुद्धीने केली ।
म्हणून महासत्तेच्या शाही मुकुटाची
रत्नांकित चकाकी, शतपटीने वाढली ॥५॥
निवडणुकीनंतर डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन
झाले गेले, विसरून जातो ।
राष्ट्रहिताचा संकल्प, त्यांच्या रक्तातच असतो
म्हणून नेतृत्व जगाचे, अमेरिका समर्थपणे करतो ॥६॥
अमेरिकन लोकशाहीची प्रगल्भता बघून
आम्ही थोडं शहाणपण शिकावं ।
सत्तेचं घाणेरडं राजकारण त्यागून
त्यांच्या आदर्श लोकशाहीचं अनुकरण करावं ।

**– पी.बी.भेंडे,** पुसद

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.